अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# नेपाळ भेटीतून नवी ऊर्जा

भारत आणि नेपाळ हे एकमेकांच्या अतिशय जवळचे शेजारी राष्ट्र मानले जातात. अगदी प्राचीन काळाचा विचार केला तर नेपाळ हे जणूकाही भारताचेच उपांग आहेत, असेच चित्र पाहायला मिळेल. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या दोन्ही देशांमध्ये असलेली सांस्कृतिक आणि ऐतिहासिक साम्यस्थळे आहेत. परंतु अगदी जवळचे मित्र असूनही भारताकडून नेपाळची काही प्रमाणात उपेक्षाच झाली, असे म्हणावे लागेल. अनेक बाबतींमध्ये भारतावर अवलंबून असणाऱ्या नेपाळला आपण अधिकाधिक जवळ करावे. आणि त्याच्या प्रगतीमध्ये आपलाही विकास साधावा, असे एकाही भारतीय पंतप्रधानाला वाटले नाही. आता तब्बल सतरा वर्षांनंतर भारताचे पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदी यांनी नेपाळला भेट दिली. यातून भविष्यातील आपल्या नव्या योजनेचा सूत्रपात केला आहे. पंतप्रधान झाल्यापासून मोदी यांनी नियोजनपूर्वक परदेश दौरे सुरू केले आहेत. किंबहुना ज्याप्रमाणे गेल्या १७ वर्षांत एकाही भारतीय पंतप्रधानाला नेपाळला भेट देण्याची इच्छा झाली नाही, त्याचप्रमाणे पंतप्रधान झाल्याझाल्या भूतानला भेट देणारे मोदीसुध्दा पहिलेच भारतीय नेते असावेत. आतापर्यंत तर अनेक पंतप्रधानांनी राज्यकारभार स्वीकारल्यानंतर पहिल्यांदा एकतर अमेरिकेला, रशियाला, चीनला किंवा इंग्लडचा दौरा केल्याचे आढळून येते. मोदी यांनी विचारपूर्वक आधी भारताच्या शेजारील राष्ट्रांशी आपले संबंध सुधारण्याचा बेत आखलेला दिसतो. कदाचित अमेरिकेला जाण्यापूर्वी ते श्रीलंका, बांगलादेश या देशांनाही भेट देण्याची शक्यताही नाकारता येत नाही. विशेष म्हणजे त्यांनी केलेले हे दोन दौरे भूतान आणि नेपाळसाठी आतापर्यंतच्या भारतीय पंतप्रधानांच्या दौऱ्यापेक्षा खूप वेगळे ठरले आहेत. बऱ्याच वेळेला चौकटी आखल्याप्रमाणे हे परदेश दौरे होतात, चार दोन करारावर सह्या केल्या जातात आणि त्या दौऱ्यांची प्रसिध्दी केली जाते. मोदींनी सर्वप्रथम भूतानला भेट देऊन तिथल्या लोकांची मने जिंकली. तर नेपाळला तिथल्या संसदेत भाषण करताना तिथल्या नेत्यांचीदेखील पसंती मिळविण्याचा यशस्वी प्रयत्न केला. यातला महत्त्वाचा भाग असा की, त्यांनी नेपाळबरोबर १९५० साली केलेल्या एका महत्त्वपूर्ण कराराचा नव्याने विचार करण्याची इच्छा व्यक्त केली. ३१ जुलै १९५० रोजी त्यावेळचे नेपाळचे पंतप्रधान मोहन समशेरजंग बहादूर राणा यांनी आणि भारताचे राजदूत चंद्रशेखर नारायण सिंग यांनी करारावर सह्या केल्या होत्या.

## नेपाळी जनतेची मने जिंकली

या करारानुसार भारताने नेपाळबरोबरचे अनेक मुद्दे निकालात काढले होते. त्यातले महत्त्वाचे कलम असे होते की, कोणत्याही परवान्याशिवाय दोन्ही देशांतील लोकांना येण्याजाण्याची अनुमती दिली गेली होती. एवढेच नव्हे तर भारतातल्या उद्योगपतींनी नेपाळमध्ये येऊन जमिनी खरेदी करायलाही या करारानुसार परवानगी दिली होती. परंतु करारातली कलमे तशीच राहिली. प्रत्यक्षात मात्र विशेष काही घडले नाही.

नेपाळ भारताचा खरे तर सर्वांत जुना मित्र आहे. या दोन्ही देशांमध्ये अनेक गोष्टींमध्ये साम्य आढळून येते. सांस्कृतिक किंवा अगदी धार्मिक पातळीवरही नेपाळ आणि भारत यांच्यातला सारखेपणा ही मैत्री घट्ट करणारा ठरतो. अगदी तिथल्या पशुपतीनाथ मंदिराविषयी भारतातल्या लोकांना वाटणारी श्रध्दा तर नेपाळमधल्या अक्षरश: कोट्यवधी लोकांना भारतात मिळणारा रोजगार खूप मोलाचा वाटत आला आहे. आजदेखील भारतातील नेपाळी लोकांची संख्या काही कोटींच्या घरामध्ये असू शकते. खरे तर नेपाळमध्ये असलेली भौगोलिक आणि नैसर्गिक साधनसंपत्ती व्यवस्थितपणे उपयोगात आणली तर नेपाळची चांगली भरभराट होऊ शकते. परंतु तिथल्या राज्यकर्त्यांची उदासिनता तसेच मोठ्या प्रमाणावर असलेली निरक्षरता यामुळे नेपाळचा पाहिजे तसा विकास होऊ शकला नाही. नेपाळमध्ये असलेला पहाडी प्रदेश तिथे असणारी पाण्याची विपुलता आणि त्याच्या जोरावर मोठ्या प्रमाणावर वीजनिर्मिती होण्याची शक्यता लक्षात घेतली तर नेपाळ हा भारताला सर्वाधिक ऊर्जा देणारा देश ठरू शकतो. मोदी यांनी आपल्या या भेटीत एका जलविद्युत प्रकल्पाचाही शुभारंभही केला. १९५० च्या कराराची नव्याने रचना करून अंमलबजावणी करण्याची मोदींनी दाखवलेली तयारी नेपाळ आणि भारतालाही उत्साहाची किंवा विकासाची नवी ऊर्जा देणारी ठरू शकते. नेपाळ हा भारतासाठी धाकट्या भावाचा देशदेखील असला तरी मोदींना भारत हा तुमचा चांगला सहाय्यक होऊ इच्छितो, असे सांगून नेपाळला मोठे कर्ज देण्याचीही त्यांनी घोषणा केली. त्यांच्या या धोरणात्मक उदारपणाचे दोन्ही देशांनी स्वागत केले आहे. भारतातल्या उद्योजकांना नेपाळमध्ये मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध करून देण्याची यामागे योजना असल्याचे स्पष्टपणे दिसते.

## आशियाई देशांशी मैत्री

या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने विचार केला तर भारताने परराष्ट्रीय धोरणामध्ये आता मूलभूत बदल करण्याची तयारी सुरू केली असल्याचे दिसून येते. आतापर्यंत अमेरिकेच्या किंवा जागतिक बँकेच्या मदतीकडे डोळे लावून बसण्याचे काम केंद्र सरकारने केले होते. परंतु, भारताने शेजारच्या राष्ट्रांना मदतीचा हात देऊन स्वत: ताकदवान होण्याच्या दृष्टीने एक सकारात्मक पाऊल टाकले आहे. नेपाळमध्ये भारतीय उद्योजकांना व्यवसाय आणि उद्योगांसाठी मोठ्या जागा मिळाल्या तर जगाच्या नकाशावर निश्चितच भारताचे नवे ब्रँडिंग होऊ शकते. त्या दृष्टिकोनातूनच मोदींच्या नेपाळ भेटीकडे पाहता येईल. सप्टेंबर महिन्यात मोदी अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्यापूर्वी दक्षिण आशिया खंडातल्या देशांबरोबर निर्माण केलेले चांगले संबंध उपयोगी पडू शकतात. यापूर्वीच ब्राझीलमध्ये या देशांची एक परिषद झाली. त्यातून एक स्वतंत्र बँक स्थापन करण्याचा निर्णय झाला. मोदींनी या नव्या बँकेचे पहिले अध्यक्षपद भारताकडे घेऊन मुत्सद्दीगिरीच दाखविली आहे. अशा दृष्टीनेदेखील नेपाळ भेटीचं महत्त्व अधोरेखित होते. थोडक्यात सांगायचे तर अनेक वर्षे भारताच्या सतत बरोबर राहिलेल्या नेपाळला अधिक जवळ करण्याच्या दिशेने पाऊल पडले आहे. एकेकाळी एकमेव 'हिंदू राष्ट्र' म्हणून नेपाळचे वर्णन होत होते. तो नेपाळ हिंदुस्थानच्या आणखी जवळ आला आहे.